# शासकीय अध्यापक महाविद्यालय, चिखली रोड, बुलडाणा.

## कंत्राटी सुरक्षा गार्ड/पहारेकरी पुरविण्याबाबत अटीं व शर्ती

१. पुरविण्यात येणारे कंत्राटी सुरक्षा गार्ड/पहारेकरी यांना लाटी, शिट्टी व उच्च प्रतीची टॉर्चसह असले पाहीजे.
२. पुरविण्यात येणारे सुरक्षा गार्ड/पहारेकरी यांना गणवेश व ओळखपत्र देण्यात यावा.
३. कंत्राटी सुरक्षा गार्ड/पहारेकरी रजेवर असल्यास पर्यायी सुरक्षा गार्ड/पहारेकरीची व्यवस्था करण्याची आपले संस्थेची राहील.
४. महाविद्यालयात व वसतिगृहात चोरी झाल्यास किंवा अनुचित घटना घडल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी कंत्राटदार यांची राहील.
५. कंत्राटी सुरक्षा गार्ड/पहारेकरी हे संस्थेचे तात्पुरत्या स्वरूपातील कर्मचारी असल्याने त्यांना नियमित करण्याचे कोणतेही हक्क त्यांना या पदावर सांगता येणार नाही.
६. कंत्राटी सुरक्षा गार्ड/पहारेकरी यांना वेतनाची मागणी परस्पर महाविद्यालयाकडे करता येणार नाही.
७. कंत्राटी सुरक्षा गार्ड/पहारेकरी यांच्या कामाचे तास संध्याकाळी ६.०० ते सकाळी १०.०० वाजेपर्यंत राहील. या वेळेत पुर्णवेळ महाविद्यालय व परीसराची सुरक्षा/देखरेख करण्याची सर्वस्वी जबाबदारी पहारेकरी यांची राहील.
८. कंत्राटी सुरक्षा गार्ड/पहारेकरी यांना महाविद्यालय व महाविद्यालयाचा संपुर्ण परीसर आणि मुलांचे वसतिगृह व वसतिगृहाचा परीसर यांचा जागता खडा पहारा देवून सुरक्षा करावी लागेल.
९. पुरविण्यात येणारे सुरक्षा गार्ड/पहारेकरी यांचे संपुर्ण नाव, संपुर्ण पत्ता, पासपोर्ट साईजचा फोटो तसेच चारीत्र्य प्रमाणपत्र कंत्राटदाराने प्रमाणित करून त्याचे ओळखपत्र महाविद्यालयात जमा करावे. यामध्ये बालकामगार यांचा समावेश करण्यात येवू नये.
१०. कंत्राटी सुरक्षा गार्ड/पहारेकरी यांचे निष्काळजीपणामुळे महाविद्यालय, वसतिगृह व परीसरातील मालमत्तेचे नुकसान अथवा चोरी झाल्याचे आढळल्यास भरपाईची संपुर्ण रक्कम कंत्राटदाराकडून वसुल करण्यात येईल.
११. कंत्राटी सुरक्षा गार्ड/पहारेकरी यांचे सेवेसंबंधी कोणतीही हमी या महाविद्यालयाची राहणार नाही.
१२. कंत्राटी सुरक्षा गार्ड/पहारेकरी यांची काही तक्रार प्राप्त झाल्यास त्याबाबत खात्री करणे, चौकशी करण्याचे अधिकार प्राचार्य यांना राहील.
१३. निविदा कोणत्याही प्रक्रीयेवर रद्य करण्याचे अंतिम अधिकार प्राचार्य याचा राहील.
१४. कंत्राटी सुरक्षा गार्ड/पहारेकरी विना परवानगी महाविद्यालयात अनुपस्थित राहील्यास त्या दिवसाचे मानधन देय होणार नाही.
१५. कंत्राटी सुरक्षा गार्ड/पहारेकरी हे अनुपस्थित राहील्यास त्यांचे जागेवर त्या दिवसाकरीता इतर सुरक्षा गार्ड/पहारेकरी यांची व्यवस्था करण्याची सर्वस्वी जबाबदारी कंत्राटदाराची राहील.

| अ.क्र. | कंत्राटी पदाचे नाव | पदसंख्या | कामाचे स्वरूप |
|---|---|---|---|
| १ | कंत्राटी सुरक्षा गार्ड/पहारेकरी | ०१ | महाविद्यालय इमारत, महाविद्यालयाचा परिसर व मुलांचे वसतिगृहाची इमारत येथे खडा पहारा देणे |

मा.सहसंचालक, उच्च शिक्षण, अमरावती विभाग, अमरावती यांचे अधिनस्त असलेल्या शासकीय अध्यापक महाविद्यालय, बुलडाणा या कार्यालयास वरील कंत्राटी सेवा पध्दतीने करावयाच्या कामाची वेळ संध्याकाळी ६.०० ते सकाळी १०.०० वाजेपर्यंत राहील. शासनमान्य संस्था/कंत्राटदारामार्फत जाहीर निविदा मागविण्यात येत आहे.

सदर कंत्राटी सेवा पध्दतीने नियुक्त करावयाच्या सुरक्षा गार्ड/पहारेकरी पदाच्या वरील अटीं व शर्तीची पुर्तता करण्यासह निविदा स्विकारण्यात येतील. महाविद्यालयाकडे प्रति शेडयुल रू.५००/- चा रोखीने भरणा करून दि.२३.०५.२०२५ ते २७.०५.२०२५ पर्यंत सकाळी ११.०० ते सायंकाळी ४.०० वाजेपर्यंत (शनिवार व रविवार वगळता) आवेदन मिळू शकतील भरून दिलेल्या निविदा दिनांक. २९.०५.२०२५ रोजी पर्यंत कार्यालयीन वेळेत मोहोदबंद व्दिलिफाफा पध्दतीने ०१ तांत्रिक लिफाफा, ०२ दरपत्रक असे दोन पॉकीटे दोन प्रतीत तयार करून मोहोरबंद स्वरूपात तसेच पॉकीटावर कंत्राटी सुरक्षा गार्ड/सफाई कामगार असे ठळक अक्षरात लिहून सादर करावयात. दिनांक.२९.०५.२०२५ रोजी सायंकाळी ०५.०० नंतर आलेल्या निविदाचा कुठल्याही परीस्थितीत विचार केला जाणार नाही. तसेच या निविदा दिनांक.३०.०५.२०२५ रोजी दुपारी.१२.०० वाजता प्राचार्यांचे दालनात उघडण्यात येतील त्यावेळेस संबंधित निविदा धारकांनी किंवा त्यांचे प्रतीनिधी यांनी प्राचार्यांचे दालनात दुपारी १२.०० वाजता उपस्थित राहावे. सदर प्रकरणी अंतिम निर्णय प्राचार्य यांचा राहील.

(डॉ.एन.बी.चव्हाण)
प्र.प्राचार्य,
शासकीय अध्यापक महाविद्यालय, बुलडाणा

Government College of Education
BULDANA

# दरपत्रक

कंत्राटी सुरक्षा गार्ड/पहारेकरी प्रती दिवसांची रक्कम व एका महिन्याला किती वेतन लागते तो दर्शविणारा तक्ता

| अ.क्र. | कंत्राटी पदाचे नाव | प्रति दिवसाची रक्कम | प्रतीमाह वेतन |
|---|---|---|---|
| ०१ | कंत्राटी सुरक्षा गार्ड/पहारेकरी | | |

**(संस्था/अध्यक्षाचे/कंत्राटदाराचे पुर्ण नाव)** **आपला विश्वासू,**

-----------------------------------------

टिप:१) तांत्रिक लिफाफा २) दरपत्रक दोन प्रतीत मोहोरबंद करून एका मोठया लिफाफयात बंद करून महाविद्यालयामध्ये दि.२९.०५.२०२५ पर्यंत सांयकाळी ५.०० वाजेपर्यंत सादर करावेत. या वेळेनंतर आलेले लिफाफे स्विकारले जाणार नाहीत यांची संबंधित निविदाधारकांनी नोंद घ्यावी.